# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०७/२०२४ (शनिवार) सकाळ**


---

### अधिसुचना

ज्याअर्थी, माझे असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा (बु) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा श्री. विठ्ठल रूख्मणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य दिनांक १७/०७/२०२४ व दि. २२.०७.२०२४ रोजी यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यादरम्यान अंदाजे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त भाविक तसेच २५० ते ३०० पेक्षा जास्त दिंडया, पालख्यांचे आगमन होत असते.

मौजा धापेवाडा हे श्री. विठ्ठल रूख्मणी देवस्थान विदर्भाचे पंढरपूर म्हणुन ओळखले जात असुन दरवर्षी मोठया प्रमाणात भाविक दर्शनाकरिता येतात. मंदिर परीसराचे ठिकाणी भाविक हे आपले स्वत:चे खाजगी २ चाकी, ४ चाकी वाहनाने दर्शनाकरिता येतात व वाहने रस्त्याचे दुतर्फा लावून दर्शनाकरिता निघून जातात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होवून वाहतुकीची कोंडी होवून भाविकांना दर्शनाकरिता अडचणी निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी, मी हर्ष ए पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर, मुंबई पोलीस अधिनियम कलम ३३ पोट कलम २(१) तसेच गृहविभाग क्र. एम. व्हि. ए.–०५८९/सी.आर–१०६१/टि.आर./ए–२ दिनांक १९.०५.१९९० अन्वये व ११५, ११६, ११७ मोटार वाहन अधिनियम (१९८८ चा नियम ५९) या नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अकिरान्वये माझ्या प्रभाव क्षेत्राखाली असलेल्या नागपूर जिल्हा (ग्रामीण) आदेश देतो की, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ (ई) मौजा धापेवाडा येथील श्री. विठ्ठल रूख्मणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य दि. १७.०७.२०२४ व दि. २२.०७.२०२४ रोजी यात्रेचे कालावधी मध्ये पुलाखालील मार्गावर दोन्ही बाजुचे सर्वीस रोड व मंदिराचे परिसरात ‘‘नो पार्कींग झोन’’ घोषीत करण्यात येत आहे.

सदर अधिसुचना दि. १७.०७.२०२४ ते दि. २२.०७.२०२४ रोजी पावेतो अमलात राहील.

सदर अधिसुचना आज दि. १४.०७.२०२४ रोजी माझे सही शिक्यानिशी जाहीर करण्यात येत आहे.

**हर्ष ए पोद्दार (भा.पो.से)**
पोलीस अधीक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

**पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आगामी सण उत्सव आषाढी एकादशी तसेच मोहरम निमित्त शांतता समिती बैठक**

दिनांक १२ जुलै २०२४ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आगामी सण उत्सव आषाढी एकादशी तसेच मोहरम निमित्त कार्यक्रमाचे आयोजक तसेच मज्जित कमिटी यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकिमध्ये अगामी सण आषाढी एकादशी व मोहर्रम उत्सवा संदर्भात चर्चा केली. त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. त्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी पारशिवनी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात व इतर स्टाफ उपस्थित होते.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर